महाराष्ट्र लोकसेवा आयोग
Maharashtra Public Service Commission
मुख्य कार्यालय : ५½, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी - २२७९५९०० फॅक्स : २२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५
ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in

**क्रमांक : १४७७(२)/KEY/२०१९/वि.क.** **दिनांक २५ जुलै, २०१९**

**- घोषणा -**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दिनांक १३ ते १५ जुलै , २०१९ या कालावधीत घेण्यात आलेल्या "**राज्य सेवा (मुख्य) परीक्षा-२०१९**" या स्पर्धा परीक्षेच्या प्रश्नपुस्तिका क्र.२ मराठी व इंग्रजी तसेच सामान्य अध्ययन -I, II, III व IV च्या वस्तुनिष्ठ स्वरुपाच्या प्रश्नपुस्तिकांच्या चारही संचाच्या उत्तरतालिका उमेदवारांच्या माहितीसाठी www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आल्या आहेत.

**तसेच प्रस्तुत परीक्षेसाठी उमेदवारांना प्रश्नपुस्तिकांच्या उत्तरतालिकेतील प्रश्न - उत्तरासंबंधी हरकती/अभिवेदने करावयाची असल्यास, त्यांनी अधिप्रमाणित स्पष्टीकरण/संदर्भ देऊन परीक्षेचे नाव, प्रश्नसंच, प्रश्नक्रमांक यांच्या उल्लेखासह विषय व पेपर क्रमांकनिहाय (I, II, III, IV) ती आयोगाने प्रसिध्द केलेल्या हरकतीच्या नमुन्यातच करावयाची आहेत. आयोगाच्या** www.mpsc.gov.in **या संकेतस्थळावर "हरकतीचा नमुना" उपलब्ध आहे. आयोगाने विहित केलेल्या हरकतीच्या नमुन्या व्यतिरीक्त अन्य कोणत्याही नमुन्यातील हरकती स्वीकारल्या जाणार नाहीत.** उमेदवारांनी त्यांच्या हरकती विहित नमुन्यात ' परीक्षा नियंत्रक व सह सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, **५½, ७** व **८** वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१' या पत्त्यावर पाठवावीत. या संदर्भात **दि. १ ऑगस्ट, २०१९** पर्यंत आयोगाकडे पोहोचलेल्या हरकतींचीच फक्त दखल घेतली जाईल. तद्नंतर आलेल्या हरकती/अभिवेदने विचारात घेतली जाणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी.

**दिनांक :** २५ जुलै, २०१९
**ठिकाण :** मुंबई

परीक्षा नियंत्रक व सहसचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई